# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व, शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना कळविणेत येते की, दिनांक 08/08/2024 रोजी सकाळी 10.30 वाजता शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुण्यतिथि निमित्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या समोरील शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुतळयास मा. कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के यांच्या शुभहस्ते पुष्पअर्पण व अभिवादन समारंभ आयोजित केला आहे.

तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

7/8/24

संदर्भ क्रं. शिवाजी वि/शिक्षणशास्त्र/52
दिनांक. 07/08/2024

विभागप्रमुख
शिक्षणशास्त्र अधिविभाग

प्रति,

1. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुख आणि अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनींना वरील समारंभास उपस्थित राहावे. तसेच उपस्थिती बद्दल सुचना द्याव्यात.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
3. सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डवर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
4. प्रमुख, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
5. आभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सूचना संबंधीतांना द्यावी.
   अ) शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांचे पुतळयाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याबाबत.
   ब) शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांचे पुतळयास सकाळी ठिक 9.00 वाजता पुष्पहार घालण्याची व्यवस्था करावी.
6. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या कुंडया ठेवून कार्यक्रमाची सुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी. तसेच डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुतळयास पुष्पहार आणून सदर कार्यक्रमाचे अगोदर अभियांत्रिकी विभागाचे मदतीने घालण्याची व्यवस्था करावी.

---000---